
।। ॐ ।।

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

मार्च २०२२

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.
(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
Email : wardhinee@gmail.com
Website : http://www.swaroopwardhinee.org



फाल्गुन कृष्ण द्वितीया

## ‘तुकाराम बीज’

**तुकोबांनी निसर्गाशी जोडलेल्या नात्याची अनुभूती देणारा हा अभंग आपल्याला निसर्गाला जपण्याची प्रेरणा देतो.**

वृक्षवल्ली आम्हा सोयरीं वनचरें ।
पक्षी ही सुस्वरें आळविती ।।

आकाश मंडप पृथुवी आसन ।
रमे तेथें मन क्रीडा करी ।।

तुका म्हणे होय मनासी संवाद
आपुलाचि वाद आपणांसी ।।

**- संत तुकाराम**

# शाखा विभाग

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९२ व्या जयंती** निमित्त आयोजित नाविन्यपूर्ण उपक्रमांनी शाखा खुलल्या.

◆ स्वामी दयानंद सरस्वती शाखेत शिवजयंती निमित्त श्री. शुभम अग्रवाल (अखिल भारतीय विद्यार्थी परिषद संघटन मंत्री, पुणे शहर) यांनी 'भारत घडवताना शिवरायांची भूमिका' या विषयावर वर्धकांशी संवाद साधला. शिवरायांचा विचार हा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा अनेक अंगांनी आजही कसा उपयोगी आहे याविषयी मार्गदर्शन सरांनी केले शिववंदनेने कार्यक्रमाचा समारोप झाला.

◆ स्वामी श्रद्धानंद शाखेत आदर्श सूर्यनमस्कार, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आयुष्यावर आधारित कथाकथन, प्रश्नमंजुषा अशा अनेक स्पर्धांच्या चुरशीने शिवजयंती साजरी झाली. शाखेचा शाखाप्रमुख उज्वल वाघुले दादाने मुलांना महाराजांच्या आयुष्यातील महत्वाच्या घटना जसे सुरतेची लुट, पन्हाळ्यावरून सुटका याबद्दल गोष्टी सांगितल्या.

◆ समर्थ रामकृष्ण शाखेत १९ फेब्रुवारीला चांदणी भोजनाच्या रात्री तुषार मुढे दादाने शिवचरित्राचे कथाकथन केले.

RSL चे Mega Football Auction - २० फेब्रुवारीला समर्थ रामकृष्ण शाखा फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली. IPL प्रमाणे रामकृष्ण सुपर लीगच्या खेळाडूंची लिलाव पद्धतीने ५ संघात विभागणी करण्यात आली आणि अत्यंत उत्साहात सामने पार पडले.

◆ भगिनी निवेदिता शाखेत श्री. होनराज हेमंतराजे मावळे यांनी अफजलखान वधाची गोष्ट मुलींना सांगितली. शिवरायांचे धैर्य, शिवरायांचे शौर्य, शिवरायांचा पराक्रम आपल्या ओघवत्या शैलीत वक्त्यांनी मांडला. याच दिवशी विश्व सावली या संस्थेचे श्री. निलेश शेलार आणि श्री. किशोर पवार यांनी शाखेला भेट दिली. या संस्थेने मुलींना कंपास पेट्या भेट म्हणून दिल्या. यावेळी जितेंद्र गौड, किरण दरवडे, अक्षय सोनावणे उपस्थित होते. २० फेब्रुवारी रोजी मुलींना 'पावनखिंड' हा चित्रपट चित्रपटगृहात दाखवण्यात आला. वीर बाजीप्रभू देशपांडे आणि बांदल सेनेच्या पराक्रमाने घोडखिंडीची पावनखिंड झाली, याचे दर्शन मुलींना घडले. शिवरायांच्या एकनिष्ठ मावळ्यांनी स्वराज्यासाठी प्राणाची आहुती दिली, यातूनच स्वराज्याचे स्वप्न साकार झाले. या चित्रपटातील काही प्रसंग पाहताना मुलींचे डोळे पाणावले. खऱ्या अर्थाने प्रेरणा जागरण झाले आणि शाखेचे वातावरण शिवमय झाले.

◆ स्वामी दयानंद सरस्वती शाखेत २६ फेब्रुवारीला श्री. रामकृष्ण चिंचकर सर यांनी 'स्वातंत्र्यवीर सावरकर आणि छत्रपती शिवाजी महाराज' या विषयावर वर्धकांशी संवाद साधला.

## ❊ तासिका विभाग विशेष - शिक्षक प्रशिक्षण वर्ग ❊

ङस्व'-रूपवर्धिनीला अभिप्रेत शिक्षण (तासिका) या विषयाला वाहिलेला एक दिवसीय शिक्षक प्रशिक्षण वर्ग ४५ शिक्षक आणि युवांच्या उपस्थितीत पार पडला. सर्वांगीण विकास साधण्यासाठी 'स्व'-रूपवर्धिनी असल्याने तिथे फक्त पुस्तकातले शिकवून भागणार नाही तर शिकवण्यासाठी अनेक आयामांवर काम करावे लागेल. म्हणून आपल्याला शिक्षक-युवा म्हणून आपल्याला काय काय जमायला हवं ? याची एक यादीच श्री. शिरीष पटवर्धन सरांनी सर्वांसमोर मांडली. वैयक्तिक प्रगती साधताना स्वतःला, समाजाला आणि पर्यायाने देशाला त्याचा उपयोग व्हावा, हेच त्या शिक्षणाचे फलित. त्यासाठी वर्धकांची सद्य शैक्षणिक स्थिती आणि त्याची कारणे समजून घेण्यासाठी एक चाचणी घेण्यात आली. यावरून वर्धकांच्या मराठी, इंग्रजी, गणित व भूमिती विषयाचे आकलन कोणत्या पातळीवर आहे याची मांडणी व विविध अभ्यास कौशल्ये व माध्यमांचा वापर करून यामध्ये सुधारणा कशी करता येईल यासाठीची उपाययोजना राहुल कोकीळ दादाने मांडली. कृतियुक्त तासिकेतून संकल्पना स्पष्ट करण्याचे कौशल्य आणि पाठाच्या पूर्व तयारीचे तंत्र प्रयोगशील व्हायला हवे असे मनीषा पाठक ताईंनी सांगितले. युवक व शिक्षकांकडून काही प्रयोग त्यांनी करून घेतले आणि त्यातून अनेक कल्पना पुढे आल्या.

## ❊ व्हर्चुअल क्लासरूम (आभासी तासिका) उद्देश आणि तंत्राचा वापर ❊

हे सत्र लताताई पुरंदरे यांनी घेतले. वर्धिनीत व्हर्चुअल क्लासरूम नक्की का करायची आहे, त्याची गरज आणि आवश्यकता त्यांनी समजावली. पीपीटीद्वारे, ध्वनी विषय कसा शिकवता येईल हे प्रत्यक्ष दाखवले. गौरीताई शिंदे हिने पीपीटीद्वारे त्रिकोणाचे गुणधर्म हा विषय शिकवला. दोन्ही ताईंनी व्हिडिओ, पीपीटी अशा विविध माध्यमांचा वापर करून दाखवला. शेवटी प्रत्येक शिक्षक व युवकाने एकेक विषय घेऊन आपापली व्हर्चुअल कलास रूमवर शिकवण्याची तयारी सुरु करण्याचा निश्चय केला.

**✻ अभिनंदनीय वार्ता ✻**

मैदानातील यश... कबड्डीत विजय...

बदामी हौद संघ, पुणे, आयोजित ४५ किलो वजनी गट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भैरवनाथ संघ भिवरी यांच्याशी लढत देऊन 'स्व'-रूपवर्धिनी संघाने १८ गुण मिळवून दणदणीत विजय मिळवला. विजयी संघातील वर्धकांचे, विभाग पालक डॉ. विनेश नगरे, प्रशिक्षक जितेंद्र काळे, केंद्रीय मैदान प्रमुख ओंकार देशमुख, शाखा विभाग प्रमुख शुभम जगताप व सर्व क्रीडा शाखेचे अभिनंदन.

# युवा विभाग

'निर्माण' शाखेअंतर्गत गेले काही महिने युवा विभाग सातत्याने युवांमधील वक्तृत्व कौशल्य वाढवण्याचा प्रयत्न करीत आहे. ६ फेब्रुवारीला प्रा. विजय नवले यांनी २७ युवांची वक्तृत्व कार्यशाळा घेतली. विषय मांडण्यासाठी वाचनाची आवश्यकता असल्याने पुस्तकातील मुद्दे कसे काढायचे व इतर माध्यमांचा वापर कसा करायचा याविषयी चर्चा झाली. बोलताना किस्से, अनुभव सांगता आले पाहिजेत, विचार करता करता बोलता आले पाहिजे व बोलता बोलता विचार करता आला पाहिजे, बोलताना विनोद करता आला पाहिजे हे उदाहरणासहित त्यांनी समजून सांगितले.

**✻ एक अनोखा उपक्रम - कथाकथन सारसबागेत. ✻**






जीवन कौशल्ये शिकणे हा मुख्य उद्देश असणाऱ्या या कार्यशाळेत वक्तृत्व कौशल्य वर्गातील १८ युवा, वर्धकांना अनोळख्या श्रोत्यांसमोर आपले विचार मांडण्याचे आव्हान देण्यात आले. समोर दिसणाऱ्या अनोळखी श्रोत्यांची विनंती करून वेळ घेणे, सारसबागेत फिरायला व देव दर्शनासाठी आलेल्या नागरिकांना वर्धिनीचा परिचय



देणे, ऐनवेळी तयारी करून कथा सांगणे अशी अनेक गोष्टी कार्यकर्त्यांनी सहज केल्या. सारसबाग येथे सर्व भावी वक्त्यांचे एकत्रीकरण झाले. अर्धा तास सर्वांनी विषयाची तयारी केली. सारसबाग येथील देशासाठी बलिदान देणाऱ्या क्रांतिकारकांच्या स्मारकास सर्वांनी अभिवादन केले. १६ जणांचे ८ गट करण्यात आले. नंतरच्या एक तासात सर्वांनी आपण तयार केलेल्या क्रांतिकारक कथा एकूण ३५ नागरी गटांना, अंदाजे १६३ नागरिकांना सांगितल्या. अचानक मिळालेल्या या संधीचे वर्धक वर्धिकांनी सोने केले.



### ❊ हरिश्चंद्रगड मोहीम ❊



दि. १३ ते १५ फेब्रु. २०२२ या कालावधीत ४० जणांच्या ११ वीतल्या वर्धकांची सहल उत्साहाने व जोमाने पार पडली. एकत्रीकरण झाल्यावर प्रबोध सभागृहात शिववंदना घेऊन सहलीसाठी प्रस्थान केले. प्रवासात डफाच्या तालावर पद्य मैफिलीने रंगत आणली. रात्री गडावर पोहोचल्यावर सोमेश्वर मंदिरात पसायदान घेऊन दिपविसर्जन झाले. दुसऱ्या दिवशी पहाटे उपासना आणि प्रबोधनाने दिवसाची सुरुवात झाली. आकाश देशमुख दादाने शैक्षणिक शाखेनुसार (विज्ञान, वाणिज्य, कला) गट केले. प्रत्येक गटाला रात्रीच्या स्पर्धेची माहिती देऊन तयारी करण्यात सांगितले. गटानुसार खेळ घेण्यात आले. त्यातील दंड रींग, कब्बडी, ध्वज युद्ध, रस्सीखेच, दोन गटातील खेळांनी आणि घोषणांनी गड दुमदुमून गेला.

प्रेरणा सत्रात जितेंद्र कोठारी यांनी वर्धिनीचा युवक कसा, एक युवक म्हणून आपण समाजातील समस्यांना कसे सामोरे गेले पाहिजे याविषयी संवाद साधला. गणेश गुहा व इतर आठ गुहा, कोकणकडा, तारामती शिखर, केदारेश्वर मंदिर (शंकराची पिंड), सोमेश्वर मंदिर युवकांना दाखविण्यात आले. गणेश गुहेत गणपतीची आरती करण्यात आली.

आकाश देशमुख दादांनी SWOT Analysis (Strength - क्षमता, Weakness - कमतरता, Opportunity - संधी, Threats - धोके) यावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवशी तारामती शिखरावर ध्वजवंदन करून परतीचा प्रवास त्याच उत्साहात झाला.



## उत्थान विभाग

### ❊ मासिक प्रशिक्षण ❊



या प्रशिक्षणात जानेवारी महिन्याचा आढावा, कोणते उपक्रम साजरे केले, त्यात काय नावीन्य होते याबाबत आढावा घेतला, तसेच पूर्ण फेब्रुवारी महिन्यात काय नियोजन असणार आहे, कोणते कार्यक्रम साजरे करणार आहोत, याबाबत चर्चा झाली. त्यानंतर श्री. शिरीष पटवर्धन सरांनी कार्यकर्ता जडणघडणीचे टप्पे सांगितले. आपल्याकडे येणाऱ्या मुलांची कोणती माहिती असावी याची चर्चा झाली.

### ❊ शिवजयंती ❊



सर्वच भागात शिवजयंती उत्सव मोठ्या दिमाखात पार पडला. नृत्य, पोवाडा, भाषण, वेशभूषा याचे सादरीकरण झाले. कसबा भागात चेतन कुसाळकर (युवा विभाग प्रमुख), लष्कर भागात पुष्पाताई नडे (सहकार्यवाह), महात्मा फुले भागात सुरेश पवार (युवक), अभय पोते (युवक), कोरेगाव पार्क भागात शुभम जगताप (शाखा विभाग प्रमुख) हे कार्यकर्ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून आले होते. या कार्यक्रमातून मुलांच्या कल्पकतेला वाव मिळाला. कसबा भागात पर्यावरण पूरक, लष्कर भागात मोठ्या संख्येत, कोरेगाव भागात मिरवणूक काढून शिवजयंती साजरी झाली. विशेष म्हणजे कसबा भागात पुरक आहार म्हणून घुगऱ्या देण्यात आल्या. कार्यक्रमातून एकी, वेळेचे नियोजन, जबाबदारी, संधी, व्यवस्थापन अशा सर्व गोष्टींचे अनुभव अभ्यासिका प्रमुख व विद्यार्थी यांना मिळाले.



### ❊ विज्ञान दिन ❊



ज्ञानज्योती व हरकादास अभ्यासिकेवर योगेश तांबट सरांनी विज्ञानासंदर्भात विविध प्रयोग व खेळ मुलांना सांगितले. मुलांनी विज्ञान प्रयोगांचे सादरीकरण केले व सुर्यमाला, ऋतूचक्र यांच्या प्रतिकृती बनवल्या होत्या.

### ❊ इतर कार्यक्रम ❊

रथसप्तमीला सर्व अभ्यासिकांमध्ये प्रत्येकी १२ ते १५ सूर्यनमस्कार घालण्यात आले. संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त अभ्यासिकेची, परिसराची स्वच्छता असे उपक्रम राबविण्यात आले. मराठी राजभाषा दिनानिमित्त मराठी लेखात, मराठी लेखक, कवी, साहित्यिक यांची माहिती अभ्यासिकेतील मुलांनी सांगितली.

- **शिक्षणोत्सव** – सर्व अभ्यासिकेत मुलांचे पाढे, विविध गणित, पुस्तकातील संकल्पना, भाषिक कोडी, समानार्थी, विरुद्धार्थी शब्दांचे तक्ते, प्रतिकृती असे शैक्षणिक साहित्य मुलांकडून करून घेण्यात आले.
- **पावनखिंड** – शिवजयंतीच्या उत्सवानंतर इ. ९ वीतील सर्व विद्यार्थी व अभ्यासिका प्रमुख यांनी 'पावनखिंड' चित्रपट पाहिला. एकूण ६५ संख्या होती. उत्साहपूर्ण वातावरण, शिवाजी महाराजांचा जयघोष व सामुहिक पद्याचा अनुभव खूप छान होता. यातून मुलांना पन्हाळा, विशाळगड, घोडखिंड या ठिकाणांचा व सरदार आणि मावळ्यांचा इतिहास समजला.

### ❊ संघ शिक्षावर्गामध्ये झालेली भेट, भेटीतून काम समजून घेतले आणि प्रत्यक्ष अभ्यासिका सुरु झाली. ❊

उत्थान विभागाचे प्रमुख श्री उमेश माळेकर यांनी वर्धिनीचे काम आणि अभ्यासिका यांची माहिती आपल्या एक शिबिरार्थी मित्राला सांगितली. त्या मित्राने प्रेरित होऊन वर्धिनीसारखेच काम त्याच्या गावात, शिराळ्यामध्ये मार्च महिन्यात सुरु केले. चांगल्या कामाची गरज सर्वत्र आहे आणि ते करणारे नागरिकही पुढे येत आहेत. आपल्याला फक्त ही प्रेरणा पुढे देत रहायचे आहे.

## पाकोळी बालवाडी

हळूहळू कोरोनाच्या बंधनातून आपण सर्वजण मुक्त होत आहोत. कोरोनाची काळजी घेऊन पुढे जायचे हे लक्षात घेऊन पाकोळी बालवाडीतल्या इ. पहिलीत जाणाऱ्या मुलांसाठी ३ फेब्रुवारीला 'बालसंस्कार' वर्गाची सुरुवात झाली. यासाठी आधी १ फेब्रुवारीला पालकसभा घेऊन त्यात पालकांना सर्व नियम सांगण्यात आले.

प्रत्येक वर्गात किमान १० ते १२ मुलं, तोंडाला मास्क व पाण्याची बाटली अशा तयारीने उपस्थिती होती. प्रसन्न वातावरणात वर्गाची सुरुवात झाली आणि मुलांच्या किलबिलाटाने वर्धिनीतले वातावरण बदलून गेले.

गँणेश जयंतीला मुलांनी अथर्वशीर्षाचे पठण केले. १९ फेब्रुवारीला शिवजयंतीला मुले विविध वेशभूषा करून वर्गात उपस्थित होती. लाकडी ठोकळ्यांचा किल्ला करून शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून वर्गाला सुरुवात झाली. मा. पुष्पाताई नडे यांनी हिरकणीची, सौ. मनीषा ताईंनी सावळा तांडेल यांच्या पराक्रमाची गोष्ट मुलांना सांगितली. बालवाडीची माजी विद्यार्थिनी ओवी यंदे हीने पोवाडा सादर केला तर मुलांनी 'आम्ही गड्या डोंगरचे राहणार...' हे पद्य म्हटले व घोषणा देऊन वर्ग दुमदुमून गेला.

२८ फेब्रुवारीला विज्ञान दिनानिमित्त मुलांनी तरंगणे – बुडणे, ज्वलनास हवेची गरज असते, लोहचुंबकाला चिकटणाऱ्या व न चिकटणाऱ्या वस्तू जलचक्र इ. प्रयोग करून दाखवले. मा. विश्वास कुलकर्णी सरांनी वर्गाला भेट दिली. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मुलांनी आत्मविश्वासाने उत्तरे दिली व प्रयोग करून दाखवले.

छोट्या व मधल्या गटातल्या मुलांसाठी दृकश्राव्य पद्धतीने आठवड्यातून दोनदा वर्ग सुरू आहेत.

**❇ विकसित व्हावे, अर्पित होऊनी जावे ❇**

**१ व्यक्ती, १ विषय, २२ वर्षे, २५ वस्त्या, ५२५ महिला...**

दीर्घकाळ गाजावाजा न करता पण निर्धाराने चालत असलेला वर्धिनीचा प्रकल्प **प्रौढ महिला साक्षरता वर्ग.**

कुणी फार विशेष दखल घेत नसलं तरी कबीर आजी मात्र महिला साक्षर करण्याचे काम अतिशय मनापासून करीत आहेत. हे काम आहे शिक्षणाचे, महिला सबलीकरणाचे, समाज उभा करण्याचे. त्यांचे या कामातील अनुभव अत्यंत प्रेरणादायी व संवेदनशील आहेत.

कारण गेली २२ वर्षे अखंड व सातत्याने सावित्रीमाईचा वसा स्वीकारून आजवर २५ वस्त्यांमधील ५२५ हून अधिक महिलांना त्यांनी साक्षर केलं आहे. त्यांच्या हातात पुस्तके पोहचवली आहेत, अक्षर ओळख करून दिली आहे. 'एकाने शिकवूया एकाला, साक्षर करूया समाजाला' ही ओळ साक्षात जगणाऱ्या **कबीर आजी.**

काशेवाडी, भीमनगर, सदानंदनगर, इंदिरानगर, मंगळवार पेठ, गाडीतळ, जुना बाजार, आंबेडकर कॉलनी, श्रमिकनगर अशा अनेक वस्त्यांमधील सर्व वयोगटातील महिलांना साक्षर व कणखर करण्याचे काम सुगंधा कबीर आजींनी केले आहे. त्यांचा या कामाचा सुगंध कबिराच्या दोह्याप्रमाणे सर्वदूर पोहोचो. या त्यांच्या कामाचे कौतुक सोमवार पेठेतील सूर्योदय मित्रमंडळातील कार्यकर्त्यांनी महिला दिनाचे औचित्य साधून केले. आजींचे अभिनंदन.

# समुपदेशन विभाग

पालकसभा – इ. १० वीतल्या वर्धकांच्या पालकांसाठी खालील शाखांमध्ये 'दहावी पाल्याची, साथ पालकांची' या विषयावर पालकसभा घेण्यात आल्या. सर्व ठिकाणी पालकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

| दिनांक | शाखा | वक्ते |
|---|---|---|
| ५-२-२०२२ | स्वामी सुबोधानंद व शाहू शाखा | श्रीमती शिल्पा तांबे |
| ५-२-२०२२ | भाग १, ५ व उत्थान विभाग | श्रीमती लता टिळेकर |
| ८-२-२०२२ | स्वामी दयानंद सरस्वती शाखा | श्रीमती पुष्पा नडे |
| १२-२-२०२२ | स्वामी ब्रह्मानंद शाखा | श्री. अक्षय कदम |

**पालकांना मार्गदर्शन करताना खालील विशेष मुद्द्यांवर चर्चा झाली.**

◆ या वयातील मुलांशी पालकांचे मैत्रीचे नाते असले पाहिजे.

◆ परीक्षा होणार की नाही, कशी होईल याचा सध्या मुलांना ताण आहेच. प्रत्येक विद्यार्थी त्याच्या क्षमतेनुसार अभ्यास करत असतो, त्याला त्याच्या बौद्धिक क्षमतेनुसार गुण मिळतील. जास्तीची अपेक्षा त्यांच्यावर लादू नये.

◆ घरात मुलांशी सुसंवाद असावा.

◆ अभ्यासाबरोबर त्यांच्या आहाराकडे पण नीट लक्ष असावे.

◆ पाल्याच्या विकासात पालकांची भूमिका महत्त्वाची असते.

◆ आपली मुले नियोजनबद्ध अभ्यास करीत आहेत ना याकडे लक्ष असावे.

### ❇ पालककट्टा ❇



दि. १८ फेब्रुवारीला स्वामी दयानंद शाखेत 'आनंदमय पालकत्व' हा विषय शाखेच्या पालकांसाठी सौ. मेधा नगरे यांनी मांडला. सुरुवातीला काही खेळातून पालकांनी मुलांशी कसे वागले पाहिजे हे ताईंनी सांगितले. घरात मुलांशी सतत सुसंवाद साधा, त्यांना कामाची जबाबदारी द्या, सहभागातून ते शिकतील, मुलांची इतरांशी व घरातल्यांशी तुलना करू नका, परीक्षेतील गुणांचा ताण देऊ नका इत्यादी मुद्दे त्यांनी मांडले.



### ❇ संयम प्रकल्प ❇

दि. १० फेब्रुवारीला ऋतुजा नराल ताईने स्वामी अभेदानंद शाखेत 'पंचकोश' व १२ फेब्रुवारीला श्री. सुरेश पवार यांनी 'मैत्री आणि सौंदर्य' हा विषय मांडला. मुलांनी गटशः मैत्री आणि माणूस, मैत्री आणि पुस्तक, मैत्री आणि निसर्ग या विषयांवर चर्चा केली. तसेच त्यांनी आदर्श मैत्री, मैत्रीतील आदर्श गुण, मैत्री विषयावरील चित्रपट, कविता या मुद्द्यांना धरून 'मैत्री वृक्ष' चित्रातून साकारला. ऋतुजा ताईने 'अन्नमय कोश' स्पष्ट करताना शरीर सुदृढ राहण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी मुलांचे खेळ घेऊन समजून सांगितले. मनोमय कोशातील भावनांचे नियंत्रण कसे असावे हे 'मुनिबा माझिरा' या व्यक्तीच्या गोष्टीतून सांगितले. आनंदमय कोश या विषयावर चित्रफीत दाखवून सत्राची सांगता झाली.

### ❇ व्याख्यान ❇

दि. १० फेब्रुवारीला वर्धिनीच्या विभागातील सर्व कार्यकर्त्यांसाठी 'गुंफण नात्यांची' या विषयावर श्री. विजय केळकर सरांचे व्याख्यान झाले. ते म्हणाले, 'नातेसंबंध टिकून राहण्यासाठी मनातून नको असलेले विषय काढून टाकावेत. मिळून मिसळून राहावे, सतत सकारात्मक राहावे. आपल्यापेक्षा अनुभवी, हुशार व्यक्तींच्या सहवासात राहून त्यांचे अवलोकन करावे.'

'स्व'-रूपवर्धिनीच्या सामाजिक व शैक्षणिक कामात गेली २० वर्षे सक्रिय काम करणाऱ्या **समुपदेशक मेघाताई नगरे** यांचा सत्कार रोटरी क्लब तर्फे करण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांना अभ्यास कौशल्ये, जीवन कौशल्ये यांचे शिक्षण, महिला पालक व विद्यार्थी यांचे समुपदेशन, गृहसंपर्क आणि किशोरवयीन मुला मुलींच्या प्रश्नात संवेदनशीलतेने काम अशा प्रकारे ताई कार्यरत आहेत. ताईंचे मनःपूर्वक अभिनंदन !

## स्पर्धा परीक्षा केंद्र

दि. १९ फेब्रुवारीला 'स्व'-रूपवर्धिनी अभ्यासिका, ज्ञानेश अभ्यासिका व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे अभ्यासिका येथे शिवजयंती विधायक रीतीने साजरी झाली. वर्धिनीत सौ. सुरेखा चिव्हे मावशी यांनी, ज्ञानेश अभ्यासिकेत सौ. विमल दरेकर मावशी यांनी शिवरायांच्या प्रतिमेला हार घालून पूजन केले. तीनही अभ्यासिकेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे शिवाजी महाराजांचे चरित्र तसेच त्यांच्या विविध प्रशासकीय गुणांची मांडणी केली. प्रशासनात काम करताना याचा विद्यार्थ्यांना निश्चित उपयोग होईल.

**✻ अभिनंदन ✻**

- सौ. छाया मौर्य – मुंबई पोलिस शहर
- श्री. शशिकांत होटकर – मुंबई पोलिस शहर
- श्री. सुरज पवार – पिंपरी चिंचवड, पोलिस शहर
- श्री. अक्षय मजगुडे – SRPF
- श्री. गणेश मुंडे – पी.डब्ल्यू.डी., सहाय्यक अभियंता
- श्री. किरण उकिरडे – पोलिस उपनिरीक्षक

**केंद्रातील या सर्व विद्यार्थ्यांची महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनात विविध पदांवर निवड झाली आहे. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.**

# महिला विभाग - रुग्ण सहाय्यक वर्ग




यावर्षी कोरोनाचे बंधन उठल्यामुळे वर्गाचे १० ते १२ मार्च निवासी शिबिर वर्धिनीच्या इमारतीत झाले. पुणे, माले व चऱ्होली या तीनही वर्गातल्या ६० मुली व १० शिक्षक, कार्यकर्ते यात सहभागी झाले होते. यातील काही विशेष –

- उद्‌घाटन – प्रसिद्ध चित्रकार मा. रवींद्र देव सरांनी शिबिराच्या उद्‌घाटन सत्रात ‘चित्रे कशी वाचावीत’ हा विषय मांडला. त्यांनी स्वतः काढलेली चित्रे मांडून त्यातील संकल्पना, रंगनिवडीचे तंत्र स्पष्ट केले. ते म्हणाले, ‘प्रत्येकात काही ना काही कलागुण लपलेले असतात. ते ओळखून जोपासले पाहिजे. त्यामुळे आपले जीवन आनंदी होते.’ त्यांनी काढलेले एक निसर्गचित्र वर्धिनीला भेट दिले.

**✻ रुग्ण सहाय्यक शिबिर २०२२ ✻**

| दिनांक | विषय | वक्ते |
|---|---|---|
| १० मार्च २०२२ | उद्‌घाटन – चित्रकला | श्री. रवींद्र देव |
| | अतिदक्षता विभाग | डॉ. माधव केळकर |
| | ‘स्व’ची ओळख | श्रीमती बागेश्री पोंक्षे |
| | सहजीवनाच्या उंबरठ्यावर | श्रीमती साधनाताई सेठीया आणि सहकारी |
| | PCOD | डॉ. विनेश नगरे |
| | प्रा संस्था परिचय | डॉ. प्राजक्ता कोळपकर |
| ११ मार्च २०२२ | अंधश्रद्धा निर्मुलन | श्रीमती नलिनी जाधव |
| | बौद्धिक खेळ | श्रीमती उषाताई दांडेकर |
| | समारोप – अंटाक्ट्रिका | श्री. सुहास काणे |

- अतिदक्षता विभागाचे तज्ज्ञ डॉ. माधव केळकर सरांनी या विभागाची संपूर्ण माहिती व इथे काम करणाऱ्या परिचारिकेची जबाबदारी मुलींना समजून सांगितली. विभागातील स्वच्छता व खंबीरपणे, जागरुकतेने काम करण्याचे महत्त्वही स्पष्ट केले.
- श्रीमती बागेश्री पोंक्षे ताईंनी मुलींकडून स्वतःचे 'SWOT' विश्लेषण खेळातून करून घेतले. स्वतःतील बलस्थाने (Strength) ओळखलीत तर तुमच्यातील कमी असणाऱ्या (Weakness) गोष्टींना मागे सारून वेळेत त्यातील धोके (Threats) ओळखून समोर आलेल्या संधीचे (Opportunity)

आपण सोने करू शकतो हे सर्वांच्या लक्षात आले.



- सौ. साधनाताई सेठिया यांनी सहजीवनाच्या उंबरठ्यावर या विषयातून आपला सहचारी कसा निवडाल, आपल्या घरातील सदस्यांशी सुसंवाद कसा ठेवाल, आपला संसार सुखी, समाधानी कसा होईल हे मुद्दे मांडले. यातून एकमेकांना समजून घेतल्याने जीवन सुखकर आणि आनंदी होईल हे लक्षात आले.
- सध्या PCOD या आजाराने अनेक युवतींना/महिलांना त्रासले आहेत. पाळीची अनियमितता म्हणजेच PCOD हे स्पष्ट करताना स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. विनेश नगरे सरांनी ते टाळण्यासाठीचे उपाय सांगितले. ते म्हणाले 'शरीर सुदृढ व तंदुरुस्त व्यायामानेच राहू शकते. व्यायाम हा यावर रामबाण उपाय आहे.'
- प्रा फौंडेशनच्या संस्थापिका डॉ. प्राजक्ता कोळपकर ताईंनी स्वतः सुरू केलेल्या दिव्यांग मुलांसाठीच्या पुर्नवसन केंद्राची माहिती व त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी जीवन प्रवास व्याख्यानातून मांडला.
- सौ. नंदिनी जाधव ताईंनी प्रात्यक्षिकातून अंधश्रद्धा निर्मूलन विषय मांडला.
- सौ. उषाताई दांडेकर यांनी वेगवेगळ्या बौद्धिक खेळातून आपण आपले कान व डोळे उघडे ठेवून वावरले पाहिजे त्यामुळे सफाईदारपणे काम होते. एकत्रितपणे काम करताना सुसंवाद असला पाहिजे, दवाखान्यात काम करताना आपण एकटे नसून अनेक जण बरोबर असतात म्हणजेच संघटन ही महत्त्वाचे आहे. स्वतःतील कल्पक वृत्ती कायम जागी ठेवा, रोजच्या कामात नाविन्य शोधत रहा. त्यामुळे तुम्ही कायम तजेलदार, उत्साही राहू शकाल. या गोष्टी स्पष्ट केल्या.
- शिबिराचा समारोप श्री. सुहास काणे सरांनी केला. या सत्रात १९८९ साली सर स्वतः अंटार्क्टिका संशोधन मोहिमेत सहभागी होते. याची चित्रफीत त्यांनी दाखवली. यातून या खंडाची शास्त्रीय माहिती, सजीवांचा अधिवास, भारताने उभारलेली संशोधन केंद्रे व तिथे होणारे संशोधन व घडलेल्या काही रोमांचकारी घटना याची माहिती मिळाली.





- दि. १२ मार्चला सर्व विद्यार्थिनींची AFMC नर्सिंग कॉलेज व एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, महंमदवाडी येथे अभ्यास सहल झाली. AFMC नर्सिंग कॉलेज, मेडिकल कॉलेजमधील वेगवेगळ्या विषयांवरील प्रदर्शने, संशोधन विभाग, कामातील शिस्त, साधनांची उत्कृष्ट मांडणी हे बघताना नर्सिंग विषयाची व्याप्ती सर्वांच्या लक्षात आली.

देसाई नेत्र रुग्णालय ही एक सामाजिक संस्था आहे. तिथे चालणारे काम, संशोधन हे येणाऱ्या रुग्णाच्या डोळ्यांच्या आजारावर होणाऱ्या उपचारांचा अभ्यास करून होत असते. विभागातील डॉक्टरांनी सध्या लक्षात येणाऱ्या डोळ्यांच्या विविध विकारांची माहिती सांगून जनमानसांत याबद्दलचा प्रचार, जागरुकता कशी केली पाहिजे याचे मार्गदर्शन केले.

शिबिरातून व सहलीतून सर्वांना विविध विषयांची शास्त्रीय माहिती मिळाली.

### ❊ व्यक्ती व्यक्ती में जगाए राष्ट्रचेतना ❊

डॉ. प्रमोद चौधरी 'स्व'-रूपवर्धिनीचे हितचिंतक, मार्गदर्शक आणि गेली अनेक वर्षे कार्यकारिणीचे सन्माननीय सभासद आहेत. प्राज इंडस्ट्रीजचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत. जैवतंत्रज्ञानाचा औद्योगिकदृष्ट्या वापर ही संकल्पना मा. प्रमोदजींच्या मार्गदर्शनाने पुढे आली. त्यांच्या या कामाला भारतात अनेक पुरस्कार मिळाले आहेत.सन २०२० मध्ये मा. प्रमोदजींना जागतिक स्तरावरील Biotechnology Innovation Organisation (BIO) चा औद्योगिक जैवतंत्रज्ञानातील नाविन्यपूर्ण संशोधनाबद्दल **'जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर' पुरस्कार** मिळाला होता.

वर्ष २०२२ चा जैव अर्थशास्त्रातील प्रतिष्ठित **'विल्यम सी. होल्मबर्ग जीवनगौरव' पुरस्कार**ही त्यांना जाहीर झाला आहे. हा जागतिक सन्मान मिळवणारे ते पहिले आशियाई व्यक्ती आहेत.

या पुरस्काराची घोषणा करताना बायोफ्युक्स डायजेस्टचे संस्थापक जिम लेन म्हणाले, 'शून्य कार्बन सिव्हिलायझेशनचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तसेच जागतिक प्रगत जैव अर्थव्यवस्थेतील त्यांच्या नेतृत्वासाठी डॉ. चौधरींची एकमताने निवड केली आहे.'

'स्व'-रूपवर्धिनीच्या परिवाराकडून डॉ. प्रमोद चौधरींचे मनःपूर्वक अभिनंदन.